


# सोयरी वनचरी

मागील तासभर डिटेक्टिव्ह सुपरिंटेंडंट वाघ आणि डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टर कोल्हे पोलीस मुख्यालयातील सुपर साहेबांच्या (हा पोलीस खात्याच्या खास बोली भाषेतला शब्द होता) कक्षात एका जटिल प्रकरणावर चर्चा करत बसले होते. दोघे साध्या वेशात होते. वाघ साहेबांनी निळा सूट परिधान केला होता तर कोल्हे लाल–काळ्या चौकटीचा बुशशर्ट आणि निळ्या जीन्स मध्ये होते. प्रकरण जटिल होते म्हणूनच रविवार असूनही दोघे पोलीस अधिकारी त्यावर आपापली डोकी खाजावीत बसले होते. ही चर्चासुद्धा आधीच्या अनेक चर्चांप्रमाणेच निष्फळ ठरली होती.

''कोल्हे, चल जरा पाय मोकळे करून येऊ.'' वाघ ताठ बसत त्यांचे पुष्ट बाहू उंचावून आळस देत त्यांच्या खरबरीत आवाजात गुरगुरले. त्यांनी मोठ्ठा आ वासून जांभई दिली. दोन्ही पंज्यांच्या पालथ्या बाजू राठ मिशांवरून फिरवून त्यात अडकलेले चहाचे थेंब पुसले.

''होय साहेब.'' कोल्हे नेहमीच ताजेतवाने आणि सावध असत. त्यामुळे त्यांना जांभई येत नसे किंवा आळसही द्यावा लागत नसे. त्यांचे शब्द खालच्या आवाजात आणि भरभर बोलले जात. त्यांच्या मिशांत काहीही अडकत नसे.

लिफ्टने तळघरातील गाडीतळावर उतरल्यावर मोटार चालकाने सलाम ठोकून त्यांच्या लेव्हीटी मोटारीचा दरवाजा उघडला. वाघांनी त्याला मानेनेच नकार दिला. ''गणपत, मी फोन केल्यावर जेथे असेन तेथून

न्यायला ये.'' त्यांनी त्यांचा स्वर शक्य तेव्हढा गुळगुळीत करत आज्ञा केली.

''होय साहेब.'' गणपत पुन्हा सलाम करत म्हणाला. त्याच्या दृष्टीने सुपर साहेब वाघ अद्वितीय होते. साहेबांनी तरुणपणी अनेक गुंडांच्या टोळ्यांचा सामना करून त्यांचा खात्मा केला होता. मुंबई गुंडमुक्त केली होती.आता सर्वात चलाख गुन्हेगारांचा शोध घेऊन ते गुन्हे अन्वेषण खात्याची ख्याती वाढवीत होते. त्यांच्या लेव्हीटीचा चालक असण्याचा गणपतला रास्त अभिमान होता.

सुपरसाहेब आणि कोल्हे गाडी तळातून पुन्हा लिफ्टने जमिनीच्या पातळीवर आले. मुख्यालयाच्या परिसराच्या लोखंडी फाटकातून बाहेर पडले आणि दक्षिणेकडे चालू लागले.

''कोल्हे तुला काही म्हणजे काहीही कल्पना सुचतेय का?'' सकाळपासून असंख्य वेळा हा प्रश्न सुपर साहेबांनी विचारला होता.

''नाही बुवा. भेजा काही चालतच नाही.'' निरनिराळ्या शब्दात असंख्य वेळा दिलेले उत्तर कोल्ह्यांनी पुन्हा दिले.

दोघे दादाभाई नवरोजी पथाने हुतात्मा चौक पार करून गेटवे ऑफ इंडियाला पोहोचले. निळ्या हिरव्या स्वच्छ पाण्यावरून पर्यटक लेव्हीटी गाड्यातून फेरफटका करत होते. दोघा पोलिसांनी एक गाडी भाड्याने घेतली आणि चालकाला बंदरात नांगरून पडलेल्या अनेक प्राचीन तेलवाहू जहाजांपैकी केलावी नावाच्या जहाजाकडे घेऊन जाण्यास सांगितले. जहाजाच्या जिन्यावरून जहाजावर पोहोचताच तेथील एका सेवकाने विचारले ''साहेब, नेहेमीचेच?''

''हो'' दोघे एकाच सुरात उत्तरले, ''रोहू.''

खनिज तेलसाठे संपल्यापासून तेलवाहक जहाजे निरुपयोगी झाली होती. आता त्यांचा वापर इतर कामांसाठी होत होता. केलावीचा उपयोग लोकांना मासेमारीचा आनंद उपभोगण्यासाठी होत होता. जहाजाच्या अनेक तेल टाक्यांमध्ये गळ टाकून आराम खुर्च्यांमध्ये पाय पसरून बसलेल्या केलावीच्या ग्राहकांमधून सेवक दोघा पोलिसांना गोड्यापाण्यातील माशांच्या टाकीपाशी घेऊन गेला. त्याने नेहमीप्रमाणे पुढे केलेले गळ आणि आमिषाचे डबे त्यांनी नेहेमी प्रमाणेच नाकारले. बरेच ग्राहक पाण्यात उतरून मासे पकडण्याचा प्रयत्न करत होत, त्यांच्या मुलांना मासे पकडण्याचे धडे देत होते. दोघे पोलीस कपडे बदलण्याच्या खोलीत कपडे उतरवून आणि स्नान करून टाकीत उतरले. त्यांनी काही मिनिटातच पंचवीस किलो वजनाचे रोहू पकडून सेवकाकडे दिले. पुन्हा कपडे चढवून सेवकाने टोपलीत बांधून दिलेले मासे घेऊन, पैसे चुकते करून, ती जोडगोळी जहाजाच्या जिन्याखाली तरंगत असलेल्या लेव्हिटी मध्ये बसून गेटवेकडे परतली.

''कोल्हे, हे 'केलावी' काय आहे? खरे तर 'कालवण' हे नाव ज्यास्त बरोबर म्हणून द्यायला हवे होते की नाही?''

''साहेब, विसाव्या शतकातली फॉक नावाच्या चित्रकाराने मुलांसाठी 'फॅन्टम' नावाच्या नायकाची चित्र मालिका तयार केली. त्यातील नायक 'फॅन्टम' जंगलात रहात असे आणि दुष्टांचा नायनाट करत असे.''

''खल निग्रहणाय'', सुपर गुरगुरले.

''फॅन्टम् राहायचा त्या अरण्यात समुद्राच्या खाडीवर सोन्याच्या वाळूची चौपाटी होती. तिचे नाव केलावी. त्या चौपाटीवर ईडन नावाचे अभयारण्य त्याने स्थापन केले आणि जंगलातल्या मांसभक्षक प्राण्यांना मासेमारीचे शिक्षण देऊन त्या अभयारण्यात ठेवले. ते शिकारी प्राणी केलावी चौपाटीवर मासे पकडून खात.

त्यामुळे हरिणे आणि इतर चरणारे प्राणी जंगलात सुरक्षित रहात. त्यावरूनच ते नांव केलावीच्या मालकाला सुचले.''

''तुला हे सगळं कसं माहित?''

''केलावीच्या मालकानेच सांगितलं.''

येथे दोघे नरिमन् पॉईंट परिसरातील ''एक्स्क्लुझीव्हिता इन'' च्या कांचेचे दाराशी पोचले. गणवेशातील भक्कम शरीरयष्टीच्या दारवानाने त्यांच्यासाठी झुकून डाव्या हाताने दार उघडत उजव्या हाताने त्यांना सलाम केला आणि त्याच्या खांद्यावरील बहिरी ससाण्याने पंख पसरून तोल सावरला. साहेबांना ससाण्याच्या भक्कम पंखाच्या फडफडातून सुळसुळित पिसांनी झालेला सूक्ष्म असा ''सुई सुई'' असा आवाजही ऐकू आला.

वातानुकूलित भोजनगृहात मेजापाशी स्थानापन्न होत कोल्हे म्हणाले, ''डॉक्टर कुर्तकोटींच्या कर्तृत्वाने ह्यांनासुद्धा योग्य नोकऱ्या मिळाल्या.'' कोल्ह्यांचे वाक्य दरवानाच्या संदर्भात होते हे जाणून सुपर म्हणाले, ''कोल्हे, मला आणि तुला सुद्धा आपल्या अंगभूत नैसर्गिक गुणांना केकेंनी योग्य वळण लावल्यामुळेच योग्य काम मिळाले ना?''

''साहेब, तुमचे कान फारच तिखट आहेत.''

''... आणि तुझे नाक.''

''पण मुंबईच्या वासांच्या गजबजाटात त्याचा फारसा उपयोग नाही.'' कोल्हे विनयाने म्हणाला.

''खरंच! पुढच्या रविवारी यशवंतराव चव्हाण केंद्रात केकेंचा मुंबईच्या जनतेतर्फे वन्यजीव रक्षण मंच सत्कार करणार आहे.'' कोल्हे.

एव्हढ्यात दरवानाहून काहीश्या उजळ वर्णाची परिचारिका दोघा पोलिसांसमोर भपकेबाज मेन्यू ठेवून दक्षपणे थांबली.

''ताई,'' माश्यांची टोपली तिच्या समोर धरून कोल्हे म्हणाले, ''अॅजॅक्सला नेहमीप्रमाणेच बनवायला सांगाल का?''

कोल्ह्यांच्या खेळकर प्रश्नाला हसून परिचारिका वळून स्वयंपाकघराकडे जाणार तेव्हढ्यात ''... आणि तोवर तुमच्या ''इन'' च्या एक्स्क्लुझिव कोलम्बिअन कॉफीची मोठी केटली आणाल का?''

हा संवाद संपला आणि काही क्षणात कोलम्बिअन कॉफीची मोठी केटली आणि दोन सुबक कप-बशा परिचारिकेने मेजावर ठेवले. कोल्ह्यांनी कॉफी कपात ओतली. कॉफीच्या सुवासिक वासाला कोल्ह्यांनी ''आहा'' म्हणून दाद दिली. दोघांनी कॉफीचे मोठे घुटके घेतले. वाघांनी पुन्हा मूळ विषयाला हात घातला.

''आपल्याला हे प्रकरण लगेच तडीस न्यायला हवे, कोल्हे. वरून फार दबाव आहे. आपण त्या सत्काराला जाऊ तेव्हा आपल्या विरुद्ध घोषणा देणारा जमाव केंद्राच्या बाहेर असू शकेल अशी खबर आहे.''

''होय साहेब.''

''तुझ्याजागी इन्स्पेक्टर सूर्यवंशीला पाठवावे अशी सूचना आय. जि. ना वरून आल्याचे कळले आहे.''

''तो माणूस?'' कोल्हे आपल्याला दोन्ही खबरी मिळाल्याचे न सांगता इन्स्पेक्टर सूर्यवंशीच्या नावाला झटकून टाकत म्हणाला. किचकट केसचा परिणाम कोल्ह्यांचा आत्मविश्वास वाढविण्यात झाला होता.

''कोल्हे, ऐक. आपण पुन्हा आपल्याजवळ असलेल्या माहितीची उजळणी करूया. ज्यांचे खून झाले आहेत ते सर्व वकील होते. शिवाय, त्यांच्या खुनाची पद्धत एकच होती. गवंड्याच्या ओळंब्याला त्याची रस्सी सरळ ठेवण्यासाठी जे भोवऱ्यासारखे निमुळत्या टोकाचे पितळी वजन लटकवलेले असते, त्याच्या घावाने

प्रत्यक बळी घेतला आहे. त्या साठी ते वजन खास धार लावून टोकदार केले होते. ''

''होय साहेब.''

''बहुतेक साऱ्या बळी पडलेल्या व्यक्ती उच्च न्यायालयाच्या बाहेर हुतात्मा चौक ओलांडून पलीकडच्या अनेक उपहारगृहात भोजनाला जाताना मारल्या गेल्या आहेत.अपवाद फक्त एकच. श्री. शिवराम  धनकुडे, सरकारी वकील, त्यांच्या माजगाव येथील कार्यालयाबाहेर लेव्हीटीतून उतरतांना बळी पडले.''

''होय साहेब.''

''बाकीचे खून झाले तो हुतात्मा चौक गजबजलेला असतो. गजबजलेल्या चौकात ओळंब्याला लटकवलेल्या मामुली वजनाने घाव घालून खून करणे शक्य नाही. त्यासाठी घाव प्रचंड जोराने करावा लागेल. प्रत्यक्ष साक्षीदार सांगतात की बळींच्या आजूबाजूला दहा फुटात कोणीच नव्हते. खून झालेली प्रत्येक व्यक्ती एकाएकी कोसळली. शवविच्छेदनात डोक्यात खोल रुतलेले ते वजन सापडले.''

''होय साहेब.''

तेव्हढ्यात दोन परिचारकांनी एका मोठ्या तबकात दहा किलो वजनाचे खरपूस भाजलेले रोहूचे काप मेजावर ठेवले. परिचारक निघून गेले. काट्याने त्यातील एक कापवाघांनी उचलला. कोटाच्या खिशातून भरदार पंजाने एक ओळंब्याचे वजन बाहेर काढले.

''एकशे दहा ग्रॅम.'' वाघ म्हणाले.''कोल्हे,आता, हे ओळंब्याचे वजन, भर चौकात, सर्वांच्या देखत एखादा खुनी बळीपासून दहा फुटातही न जाता कवटी फोडून मेंदूत घुसेल इतक्या ताकदीने कसा बळीच्या डोक्यावर हाणू शकेल?'' प्रश्न विचारून वाघांनी रोहूचा काप तोंडात घातला.

अनेक प्रकरणात सुपर साहेबांबरोबर काम केल्यानंतरही सुपर साहेबांची निर्दय स्पष्टोक्ती कोल्ह्यांच्या अंगवळणी पडली नव्हती. त्यांना कॉफीचा घोट घेतांना चांगलाच ठसका लागला.

''अरे अरे कोल्हे! मी चुकून स्पष्ट बोललो! माझी जन्मापासूनची सवय काही मोडली नाही.''

कोल्ह्यांनीही काट्याने एक लहानसा काप उचलला आणि तो खात थोडा वेळ विचार केला.

''हा ओळंबा शिर भेदेल इतका वेग घ्यायला बऱ्याच उंचावरून डोक्यावर टाकला असावा. पण तशा उंच इमारती जेथे घटना घडल्या त्या ठिकाणांपासून बऱ्याच अंतरावर आहेत. त्याही पुरेश्या उंच नाहीत. सहा सात मजली असतील.'' इति कोल्हे.

''मग काय आभाळातून हजार फूट उंचीवरून टाकला?'' वाघ उद्गारले.

कोल्ह्यांनी काही बोलायच्या आत ते एकदम म्हणाले, ''आभाळातून, खूप उंचावरून. शक्य आहे कोल्हे, अगदी शक्य आहे!'' वाघांच्या आवाजातीलउत्साह लपत नव्हता.

''अगदी बरोब्बर साहेब. ड्रोन. ड्रोन वापरला असणार!''

''राईट, एक्झॅक्ट्ली!''

तपासात काहीतरी प्रगती झाल्याच्या आनंदात दोघांनी दोन तबके भरून भाजलेले रोहू खाल्ले, आणखी बरीच कॉफी प्यायली आणि तृप्त होऊन गणपतला बोलावून घेतले.

***

पोलीस मुख्यालयात वाघांच्या कक्षात पुन्हा दोघे विचार करू लागले.

''साहेब, आतापर्यंत सहा वकिलांचा मृत्यू ओळम्ब्याने

घेतला. हा साखळी खुनांचा प्रकार वाटतो.''

''कोल्हे आपण याचा विचार केला आहे. साखळी खून करणारा बहुतक माथेफिरू असतो आणि त्याला जो कोणी बेसावध सापडेल त्याची तो हत्या करतो. विसाव्या शतकातला रामन राघव आठव. त्याने एकाच व्यवसायातले बळी निवडले होते का? तो रात्री रस्त्यावर झोपलेले बेघर लोकच हत्येसाठी निवडायचा. इथे वकिलच का बळी पडतायत?''

कोल्ह्यांनी मान डोलवून सहमती दर्शविली आणि म्हणाले, ''साहेब, ड्रोन वापरणारा खुनी सामान्य माथेफिरू नसावा.''

''खरंय. आपण असं करूया. उद्या, सोमवारी, हुतात्मा चौक परिसरात आपला ड्रोन नजर ठेवायला उडवूया.''

''होय साहेब''

''आपण दोघेही ड्रोन चालकासोबत असूया.''

''होय साहेब.''

''चला, काहीतरी प्रगती झाली. वेळ, रोहू आणि कोलम्बिअन कॉफी सत्कारणी लागली. आता घरी जावे.''

''साहेब एक विचारू? म्हणजे, तुम्ही रागावणार नाही ना?''

''ते तू विचारल्यावर ठरवेन.'' काय प्रश्न असणार हे वाघांना माहित होते. कारण कोल्ह्यांचा निरोप घेण्याचा हा रिवाज होता.

''तुम्ही घरी पोचलात, दारावरची घंटी वाजवलीत आणि वहिनींनी विचारले 'कोण आहे?' आणि तुम्ही म्हणालात 'मी वाघ' तर वहिनींचा दार उघडायला धीर कसा होतो?''

''कारण ती वाघीण आहे. दुसरे म्हणजे, दाराला कॅमेरा आहे, तिसरे म्हणजे माझ्या बोटाच्या ठशानं दार उघडतं. तुझ्या वहिनीला दार उघडावे लागत नाही.''

''आपलं वाटलं म्हणून विचारलं.''

''कोल्हे, सोमवारी कोर्टाच्या जेवणाच्या सुटीपूर्वी एक तास चार्टर्ड बँकेच्या गच्चीवर भेटू. मी बँकेच्या वरिष्ठांशी बोलून कल्पना देऊन ठेवतो.''

***

सोमवारी दुपारी साडे बाराला मुख्य न्यायाधीशांनी अनपेक्षितपणे दुपारच्या जेवणाच्या सुटीची वेळ एक ऐवजी दोन वाजता केली. त्या आधीच मुंबई पोलिसांचा ड्रोन चालक आणि त्याचा सहाय्यक चार्टर्ड बँकेच्या गच्चीवर स्थानापन्न झाले होते. ड्रोन आकाशात बाराशे फुटावर स्थिर ठेवला होता. तो छोटासाच होता पण त्यावरील दाही दिशा निरखणारे दहा शक्तिशाली कॅमेरे होते. त्यातील दृश्ये लॅपटॉपच्या पडद्यावर सहाय्यक पाहूशकत होता आणि ते चित्रण मुद्रितही होणार होते. तसेच खुन्याच्या ड्रोनला मिळणारे रेडियो संदेश शोधणारा सेन्सरही त्यावर होता.

वाघ आणि कोल्हे लेव्हिटीने एक्स्क्लुझीव्हिता इन् ला गेले. दरवानाने त्यांना झुकून सलाम करत कांचेचा दरवाजा उघडला. एका मेजाजवळबसून दोघांनी केवळ दोन कप तुर्की कॉफी मागवली. काही मिनिटातच कप रिकामे करून डिटेक्टिव द्वय लेव्हीटीने चार्टर्ड बँकेच्या गच्चीवर परतले.

एक वाजला. कोर्टाच्या फाटकातून एकच वकील बाहेर पडला. तो वकिलाचा काळा कोट आणि पांढरी पँट अशा वेशात हवालदार लचके होता. तो रमतगमत हुतात्मा चौकातून वहाणाऱ्या लेव्हीटींच्या प्रवाहातून चौकाच्या मध्यावरील पटांगणात पोहोचला. नेहमीची जेवणाच्या सुटीतील मुंबईकरांची गर्दी होतीच. आतापर्यंत ड्रोन आकाशात इंग्रजी आठ आकड्याच्या आकाराच्या मार्गाने फिरत होता. त्याच्या खाली,वर आणि आजूबाजूला बऱ्याच घारी इतस्ततः तरंगत

घिरट्या घालीत होत्या. हे मुंबईतील नेहमीचे दृश्य होते.

हवालदार लचके मधल्या पटांगणात पोहोचले. आता त्यांना लेव्हीटींच्या रहादारीतून वाट काढतांना जसे वळसे घ्यावे लागत होते ते आवश्यक नव्हते. ते सरळ चालू लागले होते. आता ड्रोन हवालदार लचक्यांची पाठराखण करत होता. त्यांच्या शिरावर ओळंबा अचूक पडण्याला अडचण होऊ नये म्हणून ड्रोन थोडा मागेच ठेवला होता. एकाएकी, अनेकदा होते तशी दोन घारींची हवेत टक्कर होणार होती नेमकी ड्रोनच्या वर. आणि नेहमीप्रमाणेच त्यांनी जोराने पंख फडफडवून टक्कर टाळली. एकच क्षण ड्रोनमधून दिसणारे वरच्या दिशेचे दृश्य क्षणभरच अडले.

खाली, हुतात्मा चौकात,हवालदार लचके एकाएकी अंगातील त्राण जाऊन कोसळला. वाघ आणि कोल्हे तातडीने धावतच रस्त्यावर आले. जमणाऱ्या गर्दीतून डिटेक्टिव द्वय निपचित पडलेल्या लचक्यांच्या जवळ पोहोचेपर्यंत एका कर्तव्यदक्ष नागरिकाने बोलावलेली अँब्युलन्स येऊन पोहोचली होती. आरोग्य कर्मचाऱ्यांनी लचक्यांना स्ट्रेचरवर घेऊन अँब्युलन्समध्ये ठेवले. डिटेक्टिव जोडी आपली ओळख पत्रे दाखवून अँब्युलन्समध्ये बसली. दुसऱ्या कर्तव्यदक्ष मुंबईकराने त्याला सापडलेला ओळंबा कोल्ह्यांजवळ दिला.

''पोलीस मुख्यालयाला चला.'' वाघांनी चालकाला सांगितले.

''पण, सर ...''

''घाबरू नकोस, मी सांगतोय ना? चल.'' वाघ गुरगुरले.

अँब्युलन्समध्ये लचके हळूहळू शुद्धीवर आले. उठून बसले. त्यांनी डोक्यावरचा केसांचा टोप उचलला आणि त्याखालचे गोल टोपी सारखे शिरस्त्राण उचलले. आरोग्य सहाय्यकाने त्यांचे डोके तपासले.

''जखम नाही. टेंगुळ आलंय. शॉक बसलाय.'' ती म्हणाली.

पोलीस मुख्यालयाच्या आवारात वाघांनी अँब्युलन्स चालकाने पुढे केलेल्या कागदावर सही करून पेशंट ताब्यात घेतल्याची पोच दिली. दांडग्या आरोग्य सहाय्यकाच्या आधाराने अजूनही हादरलेल्या लचक्यांना प्रथमोचार कक्षात सोडून वाघ आणि कोल्हे वाघांच्या कक्षात पोचले. त्या आधी त्यांनी अँब्युलन्स मधील कर्मचाऱ्यांना झाल्या प्रकारची वाच्यता करू नये असे बजावले. लवकरच ड्रोन टीमही येऊन साहेबांच्या कक्षात पोचली.

***

डिटेक्टिव्ह सुपरइन्टेडेंट वाघ आणि डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टर कोल्हे यांनी कित्येक तास ड्रोनने टिपलेली चित्रफीत पुन:पुन्हा पहाण्यात घालवले, पण टक्कर टाळणाऱ्या घारींच्या पंखांच्या फडफडाटाने महत्वाच्या क्षणाची चित्रे झाकून टाकली. कोल्हे थकलेले डोळे झाकून पडून राहिले आणि वाघ थकलेले डोळे चोळीत बसले.

''कितीही वेळा पाहिलं तरीही त्या चित्र फितीतून काहीही दिसत नाही.'' वाघ चिरडीला येऊन म्हणाले. ''उद्या तो सूर्यवंशी आला आणि त्याला ह्यात काही महत्वाचं दिसलं आणि त्यानी खुन्याचा छडा लावला तर...''

''साहेब, आपल्याला जे सापडत नाही ते त्या माणसाला काय सापडणार?''

''खरं आहे. ॲनिमल इन्सटिंक्ट मस्ट वर्क!''

काही वेळाने वाघ साहेब आळोखेपिळोखे देत उठले.

''चला कोल्हेजी,'' काळी पट्टी लावलेली पोलीस टोपी डोक्यावर ठेवत वाघ म्हणाले.''एक्स्क्लुझीव्हिता इन्ला व्हिजिट देऊ.''मग इंटरकॉमची काही बटणे

दाबून म्हणाले, ''गणपत लेव्हीटी काढ.''

लवकरच डिटेक्टिव्ह द्वय एक्स्क्लुझीव्हिता इन् ला पोहोचले. भपकेबाज गणवेशातील आडदांड आणि काळ्याकभिन्न दारवानाने नेहमी प्रमाणे झुकून सलाम केला आणि त्याच्या खांद्यावरच्या बहिरीने पंख पसरून तोल सावरला. काचेचे दार उघडून दरवान पुन्हा ताठ झाला आणि बहिरीही पंख सावरून बसला.

दोघेडिटेक्टिव्ह एका मेजापाशी स्थानापन्न झाले. उजळ काळ्या परिचारिकेने अदबीने मेन्यू त्यांच्या समोर ठेवले. त्यांनी त्याकडे न पाहताच म्हटले,

''एक अरेबिका'', कोल्हे.

''जावा'', वाघ.

परिचारिकेने काही क्षणातच तबकातून आणलेले मागविलेल्या कॉफीचे कप टेबलावर ठेवले. कोल्ह्यांनी कप नाजूकपणे नाकाखालून हलवीत कॉफीचा गंध खोल श्वासाने छातीत भरला आणि समाधानाच्या सुस्काऱ्याबरोबर बाहेर सोडला. ''इथेच खरी अरेबिका मिळते साहेब.'' कोल्हे समाधानाने म्हणाले.

दोघांनी आपापली कॉफी संपविली आणि आणखी दोन कप मागविले. असे आणखी तीन वेळा केले. मात्र उत्तम कॉफीने चित्तवृत्ती उल्हासित होण्याऐवजी दोघांच्या चित्तावर निराशाच पसरू लागली. त्या बरोबर वरिष्ठ–कनिष्ठ नाते विरघळून समदुःखींची मैत्री पुढे आली.

''कोल्हे, काय इज्जत राहील रे आपली. सिरीयल मर्डर्स. पुरी मुंबापुरी खवळलेली. आय. जी. बहुतेक माझ्याजागी लांडगेला केसवर आणतील.''

''साहेब, तो सूर्यवंशी! तो येणार आपल्या केस मध्ये?''

दोघे समोरच्या कपाच्या तळातील कॉफीत अंधाऱ्या भवितव्याकडे बघत काही क्षण बसले.

''फारच शांत आहे इथे आज.'' कोल्हे म्हणाले.

''कोल्हे आता मंगळवार सकाळ आहे. आठ वाजले आहेत. मुंबई कामावर निघाली आहे.''

''कोल्हे,'' वाघ पुढे म्हणाले, ''ड्रोनने घेतलेल्या चित्रफितीतही अशीच शांतता होती नाही?''

कोल्हे मेजावर टेकलेले डोके उचलून ताठ होत म्हणाले, ''सर... साहेब, ओळंबा टाकणाऱ्या ड्रोनचे रेडियो सिग्नल सुद्धा ऐकू आले नाहीत.''

''ते रेकॉर्ड करण्याचे मशीनमोडले तर नसेल?'' असे म्हणत वाघ उठले आणि कॉफीचे पैसे आणि बक्षिशी मेजावर टाकून दाराकडे घाईघाईने निघाले. कोल्हे त्यांच्या मागोमाग धावले.

***

दोघा डिटेक्टिव्हांच्या मध्ये मेजावर ड्रोन ठेवला होता. त्यावर वाकून त्याचे परीक्षण करणाऱ्या दोघा तंत्रज्ञांनी ताठ उभे राहून मागे वाकून आखडलेल्या कंबरा सोडविल्या.

''सुपर साहेब, रेकॉर्डर ठीक काम करतोय.''

''मग ड्रोनचा सुगावा का लागला नाही?'' कोल्ह्यांनी प्रश्न केला.

''थांबा कोल्हे'' वाघ म्हणाले, ''तो प्रश्न आपल्याला सोडवायचा आहे.''


''आता तुम्ही जाऊ शकता'' वाघ तंत्रज्ञांकडे वळून म्हणाले. तंत्रज्ञांनी ड्रोन काळजीपूर्वक त्याच्या पेटीत ठेवला. आपली उपकरणे त्यांच्या पिशवीत नीट ठेवली आणि वाघांच्या कक्षातून बाहेर पडले.

''कोल्हे, ड्रोन डिटेक्ट झाला नाही? का ड्रोनच नव्हता?''

''ड्रोन नसेल तर काय असेल?''

''बारा वाजताहेत, चलो कोल्हे!''

''कुठे.''



''एक्स्क्लुझीव्हिता इन्. गणपत लेव्हीटी काढ.'' दुसरे वाक्य ते इंटरकॉमची बटणे दाबून बोलले आणि तातडीने कक्षाबाहेर पडले. कोल्हेही पाठोपाठ धावले.

काही मिनिटातच ते एक्स्क्लुझीव्हिता इन् च्या खिडकीजवळील मेजापाशी बसले होते. तेथून तो आडदांड दरवान ग्राहकांना दरवाजा उघडून आत सोडत असलेला दिसत होता. त्यांनी परिचारिकेला खाद्य मागवायला वेळ असल्याचे सांगितले होते. कोल्ह्यांना थांबायला सांगून बारा वीसला सुपरिनटेंडेण्ट साहेब बाहेर पडले.

''दरवान, नाव काय तुझं?''

''किलीमांजारो.''

''छान नाव आहे, पण विचित्रच आहे.''

''होय साहेब. आफ्रिकेत पर्वत आहे, त्याचे नाव माझ्या आई वडिलांनी मला दिले.''

''असं का. पण का?''

''ते मूळचे तिथलेच रहिवासी होते ना, म्हणून.''

तेव्हढ्यात ग्राहकाला आत सोडण्यासाठी किलीमांजारोने वाकून दाराच्या मुठीला हात घातला आणि त्याच्या खांद्यावरील बहिरी ससाण्याने पंख पसरून तोल सावरला.

''आणि हा पक्षी कशाला ठेवलाय?''

''काहीतरी नाविन्य म्हणून मालकांनी पाळलाय. माझ्या खांद्यावर असला म्हणजे हॉटेलला शोभा येते म्हणतात. आता थोडावेळ जेवायला जाईल.''

''जेवायला?''

''हो. मालक त्याला त्यांच्या बरोबर जेवायाला बोलावतात.''

''ते इथे येतात? पक्ष्याला बोलवायला?''

''हा पक्षी साधा नाही साहेब, हा बहिरी ससाणा आहे. शिकारी पक्षी. तो दररोज समुद्रातून मासा पकडून मालकांच्या जेवणाला घेऊन जातो.''

''पण मालक इथे न येता त्याला बोलावतात कसे?''

''हा हा हा!'' किलीमांजारो खोल आवाजात हसला आणि गुपित सांगत असल्यासारखा हळूच म्हणाला, ''त्यांच्या जवळ शिट्टी आहे, तिचा आवाज आपल्याला ऐकू येत नाही पण ह्याला येतो.'' बहिरीच्या चोचीवर जाडजूड बोटाने हळुवारपणे थोपटीत किलीमांजारोने उत्तर दिले.

''आणि... मालक कुठे आहेत.''

''ते वरच्या खोलीत जेवायला बसतात.''

''त्यांना मला भेटायचंय, कसं जायचं?''

''किचनजवळून जिन्याने वर जा, डावीकडची पहिलीच

खोली.''

''थँक यु! आणखी काही माहिती लागली तर विचारीन.'' किलीमांजारोचा हात धरून त्यात सढळ बक्षिशी ठेवत वाघ म्हणाले.

''जरूर विचारा.''

हे हितगुज संपले तेव्हाच बहिरी ससाण्याने पंख पसरले आणि गेटवेच्या दिशेने भरारी घेतली. त्याच्या पंखांच्या सुळसुळित पिसांवरून घसरणाऱ्या हवेचा सुई सुई ध्वनि वाघांच्या तिखट कानाला जाणवला.

मनातल्या मनात सुपर साहेबांनी हिशेब केला. त्याला मासा पकडून येण्याला दहा मिनिटे आणि तो शिजवून जेवायला वीस मिनिटे. अर्धा तास.

''आपल्याला अर्ध्या तासाने एक्स्क्लुझीव्हिता इन् च्या मालकांची खबर घ्यायची आहे.'' मेजापाशी बसत वाघ कोल्ह्यांना म्हणाले.

कोल्ह्यांनी परिचारिकेला खुणेनेच पाचारण केले. ''ताई, दोन गोल्ड कोस्ट आणता का?''

***

अर्ध्या तासाने डिटेक्टिव्ह जोडी बार जवळच्या जिन्याने वर गेली. वाघांनी डाव्याबाजूचा पहिला दरवाजा किलकिला केला. खोलीच्या खिडकीजवळच्या मेजावर दरवाज्याकडे पाठ करून एक मनुष्य बसला होता. त्याच्या खुर्चीच्या हातावर बहिरी बसला होता दोघे एकाच थाळीतून माश्यावर ताव मारीत होते. वाघांनी दरवाजा हळूच बंद केला.

''कोल्हे, आपण खोलीत शिरू तेव्हा मोबाईलचा व्हिडीओ चालू असुदे.'' वाघ हळूच गुरगुरले.

''होय साहेब.'' कोल्हे कुजबुजले.

''माऽऽणीऽऽक!'' खोलीतून हाक आली आणि आत कुठेतरी दार उघडल्याचा आवाज आला.

''मालकांनी मेज आवरायला गड्याला बोलावलाय वाटतं.'' कोल्हे कुजबुजले.

मिनिटाभरात आतले दार उघडून बंद केल्याचा आवाज आला. आणि कोल्ह्यांनी कॅमेरा सुरु केला. वाघांनी दरवाजा किलकिला केला. एक्स्क्लुझीव्हिता इन् च्या मालकाने भिंतीजवळच्या दुसऱ्या टेबलाचा कप्पा उघडून त्यातून एक वस्तू बाहेर काढली. ते खुर्चीच्या हातावर बसलेल्या बहिरी जवळ गेले आणि पोपटासमोर खाण्यासाठी पेरू धरावा तशी ती वस्तू बहिरी समोर धरली. ती वस्तू अणकुचीदार ओळंबा होता. बहिरीने ओळंब्याची कडी आपल्या धारदार बाकदार चोचीत धरली.

''बहादूर,काळ्या कोटातील माणूस निवडायचा. मुंबईच्या उन्हाळ्यात काळा कोट घालून फक्त वकिलच बाहेर पडतात. जा तुझ्या कामगिरीवर...'' असे मालक म्हणत असतांनाच डिटेक्टिव्ह द्वय धाडकन् दार उघडून आत शिरले. पक्षी आणि त्याचा मालक दचकले. पक्षाच्या चोचीतून ओळंबा निसटून मेजावर पडला आणि तीक्ष्ण टोकाने मेजात रुतून उभा राहिला. बहिरी क्षणात पंख पसरून उघड्या खिडकीतून आकाशाकडे झेपावला. एक्स्क्लुझीव्हिता इन् च्या दचकलेल्या मालकाला कोल्ह्यांनी हातकड्या घातल्या आणि त्याचे अधिकार सांगितले.

''पण तुमचा मुख्य पुरावा, म्हणजे बहिरी, तर आता गायब झाला'', भानावर येत मालक म्हणाले.

''अरे! गायब कसा होईल? कोल्हे, मालकांच्या खिशातली शिट्टी घ्या.''

कोल्ह्यांनी शिताफीने मालकांच्या झब्ब्याच्या खिशातली शिट्टी काढून फुंकली. काही क्षणातच बहिरी ससाणा खिडकीतून सूर मारल्यासारखा आत आला आणि खुर्चीच्या हातावर बसला.

***

रविवारी सायंकाळी यशवंतराव चव्हाण केंद्रात डॉक्टर कुर्तकोटी उर्फ केके यांच्या नागरी सत्काराचा समारंभ विशेष आनंदात साजरा झाला कारण मुंबईत, विशेषत: मुंबईतील वकील वर्गात, पसरलेले भीतीचे वातावरण वाघ आणि कोल्हे यांच्या प्रयत्नाने निवळले होते.

व्यासपीठावर केके तर होतेच पण समारंभाचे आयोजक वन्यजीव रक्षण मंचाचे अध्यक्ष श्री सदानंद सदावर्ते आणि मुंबई मनुष्येतर प्राणी हक्क चळवळीचे श्री हस्तीदन्तेही होते. मात्र, त्याहून अधिक महत्वाची उपस्थिती डिटेक्टिव्ह सुपरिंटेंडेंट वाघ आणि डिटेक्टिव्ह इन्सपेक्टर कोल्हे यांची होती. केके आणि सदानंद सदावर्ते खुर्च्यांमध्ये बसले होते, हस्तिदन्ते फारच महाकाय असल्याने त्यांच्यासाठी योग्य आसन नव्हते म्हणून उभेच होते. वाघ आणि कोल्हे यांच्या साठी उत्तम चौरंग मांडले होते.

स्वागतपर आणि सत्कारपर भाषणे झाली. केके उत्तरादाखल भाषणात म्हणाले ''...वन्य प्राण्यांचे संवर्धन करण्याची आवश्यकता विसाव्या शतकात भासू लागली. पण ते प्राणी, जसे वाघ, सिंह, गेंडे इत्यादी माणसाळवण्याजोगे नव्हते. त्यांची संख्या कमी कमी होत होती आणि एके दिवशी शेवटचा वाघ किंवा सिंह मृत्युमुखी पडल्यावर ती प्रजाती पृथ्वीतलावरून कायमची नाहीशी होणार होती. काही वर्षांपूर्वी प्राण्यांच्या केंद्रीय आणि परिघीय मज्ञा संस्थात ग्लीयल पेशी असतात हे माहित झाले. पण त्या नंतर कित्येक वर्षे त्यांचे काम काय हे माहित नव्हते. आता त्या पेशी, त्यातल्यात्यात ऑलीगोडेन्ड्राइट् पेशी, मेंदूच्या मुख्य कामात मदत करतात, त्यांच्यामुळे माहिती ग्रहण करणे आणि उपयोगात आणणे शक्य होते हे माहित झाले. त्यामुळे ह्या पेशी वापरून असे नामाशेष होऊ घातलेले प्राणी केवळ माणसाळवण्यायोग्यच करायचे नाहीत तर ते मानवाच्या बरोबरीने एका शांत अशा मिश्र समाजात वावरण्यायोग्य करायचे असे ठरवून मी संशोधन केले.  आता आपण गर्भावस्थेत प्राण्याच्या काही ग्लीयल पेशी काढून त्यांची प्रयोगशाळेत वाढ करतो. त्यांचा आकडा झपाट्याने वाढावा ह्या साठी त्यावर संस्कार करतो. प्राणी जन्मल्यावर त्याच्या केंद्रीय आणि परिघीय मज्ञासंस्थांमध्ये त्या पोहोचवतो. हा प्रयोग अपेक्षेबाहेर यशस्वी झाला. त्या यशाचे नमुने, डिटेक्टिव्ह सुपरइंटेंडेंट वाघ आणि डिटेक्टिव्ह इन्सपेक्टर कोल्हे, व्यासपीठावर उपस्थित आहेत. तसेच श्री हस्तिदन्तेही आहेत. मुंबईच्या जिजामाता उद्यानातील गोरिला आणि पर्वतीय गोरिलांच्या, भारतीय वानरांच्या, चिम्पान्झी आणि बोनोबोंच्या, ओरांग उटानच्या जोड्यांच्या अपत्यांवर केलेल्या प्रयोगांची यशस्वी उदाहरणे आतिथ्य उद्योगात, रुग्णालयात, रहदारी पोलिसात, अग्निशमन दलात पाहायला मिळत आहेत. त्यांच्या आहाराची खास व्यवस्था करावी लागली, पण त्या व्यवस्थांचे व्यवस्थापन आता आमचे वनचर सोयरेच करत आहेत...''

उपस्थितांच्या आग्रहावरून डिटेक्टिव्ह सुपरिन्टेण्डेंट वाघ यांनी त्यांच्या नुकत्याच सोडविलेल्या रहस्यमय गुन्ह्याचे पदर उलगडून सागितले. ''...माझे मित्र डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टर कोल्हे आणि मी बरेचदा एक्स्क्लुझीव्हिता इन् ला जेवायला जातो. तेथील अगत्यशील बोनोबो आणि चिम्पान्झी परिचारक आणि पर्वतीय गोरिला दरवान किलीमांजारो यांचे आम्हाला कुतूहल वाटते. मात्र एक्स्क्लुझीव्हिता इन् चा संबंध ह्या हत्त्या मालिकेशी असेल असे स्वप्नातही वाटले नव्हते. त्याचा पहिला इन्ट्यूशनल क्ल्यू होता– हवालदार लचक्यांवर हल्ला झाला त्या दुपारी आम्ही एक्स्क्लुझीव्हिता इन्ला गेलो त्या वेळेस किलीमांजारोच्या खांद्यावर बहिरी ससाणा नव्हता. दुसरा धागा ओळंबा टाकण्यासाठी ड्रोनचा वापर होत नसावा असा संशय आल्यावर आमच्या हाती आला.''

एका नाट्यमय पॉझ नंतर, ''... सर्वात महत्वाचा धागा होता आवाजाचा. ससाण्याच्या पंखांवरून वहाणाऱ्या



वाऱ्याचा एक सूक्ष्म आवाज येतो तो मला एस्क्लुझीविताइन् च्या दारवानाच्या खांद्यावरच्या बहिरीच्या हालचालीत ऐकू आला होता. ड्रोनने टिपलेल्या व्हिडीओ क्लिप मध्ये बहिरी दिसला नाही, तरी तोच आवाज, अगदी एकमेकांना टाळणाऱ्या घारींच्या फडफडातूनही, मला ऐकू आला. त्यामुळे, संशयिताची ओळख पटली.''

''त्या शिवाय,आधी एकमेव हत्त्या जी हुतात्मा चौकात झाली नव्हती, ती श्री शिवराम  धनकुडे, सरकारी वकील यांची होती,ती सुद्धा एक धागा होती.''

''एक्स्क्लुझीव्हिता इन् चे मालक लंकाधिप करोडे यांनी कबुली नोंदविली आहे.''

हस्तिदन्ते मध्येच म्हणाले ''तुमच्या एका डरकाळीनेच त्यांनी गुन्हा कबुल केला असेल''.

श्रोत्यांच्या हास्यात वाघही सामील झाले. ते पुढे सांगू लागले. ''धनकुडे आणि करोडे मित्र होते आणि करोडे अनेकदा एक्स्क्लुझीव्हिता इन् मध्ये त्यांचा पाहुणचार करत असत. धनकुडे सरकारी वकील होते आणि त्यांचा आपल्याला कधीतरी उपयोग होईल म्हणूनच त्यांचा पाहुणचार करोडे करत होते. तोच प्रसंग आला, जेव्हा करोडेवर आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप झाला आणि त्या प्रकरणात सरकारची बाजू मांडण्यासाठी धनकुडे वकिलांची नेमणूक झाली. करोडे यांनी धनकुड्यानां आपल्यावरचे आरोप गैरसिद्ध करायला मदत करण्याची विनंती केली. धनकुड्यानी ती मानली नाही. आणि त्यातूनच त्यांची हत्या झाली. पण तीच एक हत्त्या असती तर त्या मागच्या कारणाचा शोध घेऊन करोड्यांकडे संशयाची सुई वळली असती. त्यामुळे त्या हत्त्येआधी दोन आणि नंतर तीन हत्त्या करून खुनाच्या साखळीचा डाव रचला. सातवा प्रयत्न, आमच्या हवालदार लचकेंच्या हत्त्येचा, फसला. हत्यांचे शस्त्र म्हणून प्रशिक्षित आणि ग्लीयल पेशीयुक्त बहिरी ससाणा वापरला.''

''त्या ससाण्याने कबुली दिली आहे आणि अचूक नेमबाजीचे प्रात्यक्षिकही करून दाखविले आहे. त्याचे चित्रीकरणही केले आहे.''

भाषण संपविताना वाघ म्हणाले, ''आता डॉक्टर कुर्तकोटींच्या संशोधनामुळे आम्ही माणसात आलो आहोत. आम्ही आमच्या ज्या जन्मजात स्वभावांमुळे हिंस्र समजले जात होतो ते आम्ही टाकून दिले आहेत. पण मनुष्यच अपराध करतो आहे. मनुष्यानेही आपला स्वभाव बदलावा. तुमच्या उदाहरणाने आम्ही हुशार झालेले तथाकथित पशुही गुन्हे करू लागलो तर ह्या जगाची अवस्था काय होईल? आम्हाला सोयरे वनचर म्हणता येईल का? विचार करा.''

टाळ्यांच्या कडकडाटात सुपर वाघ स्थानापन्न झाले.

◆

**सुरेश भावे**
asambhave@gmail.com